# मुंबई विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग
क्र. वि.वि.वि./२४/२०१७

डॉ. सुनिल पाटील
संचालक

विद्यापीठ विद्यार्थी भवन,
'ब' पथ, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०

**परिपत्रकः**

संदर्भः शासन परिपत्रक कमांक : समिती– 2511/प्र.क.84/17 समन्वय, दि. 22/11/2017

---

वाचा :

**विषयः उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत गठीत केलेल्या समित्यांनी प्रकाशित केलेले थोर राष्ट्रीय पुरूषांचे साहित्य विद्यापीठे/महाविद्यालये व शासकीय ग्रंथालये यांच्या ग्रंथालयात उपलब्ध करून देणेबाबत.**

महोदय/महोदया,

वरील शासन परिपत्रकानुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समिती व महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती गठीत करण्यात आली आहे. या समित्यांनी आतापर्यंत प्रकाषित केलेले ग्रंथ सोबत जोडलेल्या शासन परिपत्रकात नमूद केले आहेत.

तरी, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सयाजीराव गायकवाड व अण्णाभाऊ साठे या थोर राष्ट्रीय पुरूषांचे साहित्य राज्यातील सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी राज्य शासनाने सवलतीच्या दरात उपलब्ध करून दिले आहे व सदर ग्रंथ सर्व शासकीय मुद्रणालयामध्ये विक्रीकरीता ठेवण्यात आले आहेत. सदर साहित्य राज्यातील सर्व विद्यार्थी व जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी आपल्या महाविद्यालयातील/संस्थेतील/विभागातील ग्रंथालयामध्ये वाचकांना उपलब्ध करून देण्यात यावे व सदर योजनेचा लाभ सर्व विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी सोबत जोडलेल्या शासन परिपत्रक क्रमांक : समिती – २५११/प्र.क्र.८४/१७ समन्वय दि. २२/११/२०१७ नुसार आपण योग्य ती कार्यवाही करावी व त्याचा तपशील सदर विभागास दयावा ही विनंती.

मुंबई : ४०० ०२०
दिनांक : ३० नोव्हेंबर, २०१७

[डॉ. सुनिल पाटील]
संचालक, वि.वि.वि

प्रतः विद्यापीठ विभागाचे प्रमुख व संलग्नित महाविद्यालयाचे व संस्थेचे प्राचार्य/संचालक/अधिष्ठाता यांना त्यांच्या माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

सोबत जोडपत्र.

P. A.
UNIVERSITY OF MUMBAI
/ICD/ECD/201 /-
24 NOV 2017
23423

उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत गठीत केलेल्या समित्यांनी प्रकाशित केलेले थोर राष्ट्रीय पुरुषांचे साहित्य विद्यापीठे/ महाविद्यालये व शासकीय ग्रंथालये यांच्या ग्रंथालयात उपलब्ध करुन देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः समिती-२५११/(प्र.क्र.८४/१७)/समन्वय
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
तारीख: २२ नोव्हेंबर, २०१७.

शासन परिपत्रक -

उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, महात्मा जोतीराव फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, राजर्षि शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समिती व महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती गठीत करण्यात आली आहे. या समित्यांनी आतापर्यंत खालीलप्रमाणे ग्रंथ प्रकाशित केले आहेत. :-

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे साहित्य.

| खंड क्रमांक | खंडाचे नांव |
|---|---|
| १ | Caste in India and ११ other essays |
| २ | Dr. Ambedkar In the Bombay legislature with the Simon commission and at the Round Table Conferences. |
| ३ | Philosophy of Hinduism, Indian and the pre-requisities of communism revolution and Counter Revolution Buddha or Karl Marx. |
| ४ | Riddles in Hinduism |
| ५ | Essays on Untouchable and Untouchability. |
| ६ | The evolution of Provincial finance in British-India The problem of the rupee. |

Chapter
Issue to circular to colleges.

Director KRC / DSW
for I/c Registrar 24/11/17
②

| | |
|---|---|
| ७ | Who were the shudras? The Untouchables. |
| ८ | Pakistan or partition of India. |
| ९ | What Gandhi and congress have done to the untouchables? |
| १० | Dr. Ambedkar as member of the Governor Generals Excutive Council १९४२-४६. |
| ११ | The Buddha and his Dhamma. |
| ११(अ) | Supplementary |
| १२ | Unpublished writings ancient Indian Commerce, Notes on waiting for visa miscellaneous notes etc. |
| १३ | Dr. Ambedkar as the principle Architect of Constitution of India. |
| १४ | Dr. Ambedkar and the Hindu code Bill part-१. |
| १४(अ) | Dr. Ambedkar and the Hindu code Bill part-२. |
| १५ | Dr. Ambedkar as Free Indias first Law minister and member of opposition in Indian parliament १९४७-१९५६. |
| १६ | The Pali Grammer pali Dictionary. |
| १७ | Dr. Ambedkar and his Eagalitarian Evolution part - ( १, २, ३ )- |
| १७(अ) | Dr. Ambedkar and his Eagalitarian Evolution part - ( १, २ )- |
| १७(ब) | Dr. Ambedkar and his Eagalitarian Evolution part - ३ . |
| १८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे (भाग १, २, ३). |
| १९ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता. |
| २० | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता. |
| २१ | Corresppondence |
| २२ | photobiography |
| २२(अ) | चित्रमय चरित्र |
| २३ | खंड - १ सोअर्स मटेरियल ऑन डॉ. बाबासाहेब आंबेडकर अँड द मूवमेंट ऑफ द अनटचेबल्स. |
| २३(अ) | खंड - २ सोअर्स मटेरियल डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक. |
| २३(ब) | खंड - ३ Source material on Dr. Babasaheb Ambedkar and his movement Chawdar Tank Case Courts record & proceeding. |
| २४ | Special issues - Annihilation of Caste. |
| २५ | विशेष आवृत्ती - जातिव्यवस्थेचे निर्मूलन. |

२) महात्मा जोतीराव फुले यांचे साहित्य.

समितीने प्रकाशित केलेले ग्रंथ.

१) महात्मा फुले गौरव ग्रंथ ( तिसरी आवृत्ती ) ( मराठी ) - संपादक -- हरी नरके.
२) आम्ही पाहिलेले फुले, संपादक - हरी नरके ( मराठी )
३) महात्मा फुले शोधाच्या नव्या वाटा ( पाचवी आवृत्ती ) ( मराठी ) - संपादक - हरी नरके.
४) युगपुरुष महात्मा फुले ( हिंदी ) लेखक - मुरलीधर जगताप.
५) महात्मा फुले साहित्य और विचार ( हिंदी ) संपादक - हरी नरके
६) महात्मा फुले समस्त साहित्य १ - गुलामी ( हिंदी ) अनुवादक - वेदकुमार वेदालंकार.
७) महात्मा फुले समस्त साहित्य २ - सार्वजनिक सत्यधर्म ( हिंदी ) अनुवादक - वेदकुमार वेदालंकार.
८) महात्मा फुले समस्त साहित्य ३ - किसान का कोडा ( हिंदी ) अनुवादक - वेदकुमार वेदालंकार.
९) महात्मा फुले समस्त साहित्य ४ - तृतीयरत्न ( हिंदी ) अनुवादक - वेदकुमार वेदालंकार.
१०) Collected Works of Mahatma Phule – 1 Slavery ( इंग्रजी ) Translater – P. G. Patil.
११) Collected Works of Mahatma Phule – 2 Selections( इंग्रजी ) Translater – P. G. Patil.
१२) Collected Works of Mahatma Phule – 3 Cultivators Whipcord ( इंग्रजी ) Translater – Asha Mumdale.
१३) महात्मा फुले साहित्य आणि चळवळ ( मराठी ) संपादक - हरी नरके.

३) राजर्षि शाहू महाराज यांचे साहित्य.

महाराष्ट्र शासनाकडून राजर्षी शाहू छत्रपती शताब्दी निमित्त राजर्षी शाहू गौरव ग्रंथ १९७६ मध्ये प्रथमत: प्रसिद्ध करण्यात आला होता. हा ग्रंथ ६२८ पृष्ठे + १२ छायाचित्रे इतक्या आकाराचा आहे. याच ग्रंथाची तिसरी सुधारित आवृत्ती महाराष्ट्र शासनाच्या राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समितीमार्फत गेली अडीच वर्षे तयार करण्याचे काम चालू होते. सदर ग्रंथाची तिसरी आवृत्ती १३५० पेक्षा अधिक पृष्ठांची झाली असून, त्यामध्ये शाहू छत्रपती समकालीन काही लेखक इतिहासकार, साहित्यिक, विचारवंत इत्यादींचा समावेश करण्यात आला आहे. याखेरीज या ग्रंथात शाहू छत्रपतींनी काढलेले आदेश, हुकूम, जाहीरनामे आणि शाहू महाराजांनी केलेले काही सामाजिक कायदे, तसेच शाहू छत्रपतींच्या काही दुर्मीळ छायाचित्रांचादेखील यामध्ये अंतर्भाव करण्यात आला आहे.

४) साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य.

साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांच्या एकूण ३२ दुर्मिळ कादंबऱ्या, कथासंग्रह, लोकनाट्य, नाटक, लावणी, आणि पोवाडे इत्यादी साहित्य संकलित केले आहे. या साहित्यापैकी १९ कादंबऱ्यांचे दोन खंड तयार करण्यात आले आहे. पहिल्या खंडात वारणेच्या खोऱ्यात, चित्रा, फकिरा, वैजयंता, चंदन, आवडी, माकडीचा माळ, वैर, आणि गुलाम या ९ कादंबऱ्यांचा समावेश आहे आणि दुसऱ्या खंडात रानगंगा, पाझर, हलगुज, मास्तर, कुरुप, तारा, वारणेचा वाघ, मुर्ती, अग्नीदिव्य व मयुरा या १० कादंबऱ्यांचा समावेश आहे.

५) महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे साहित्य.

महाराष्ट्र शासनाने राज्याच्या पुरोगामित्वाची जडणघडण करण्यास प्रेरणादायी ठरलेल्या महाराजा सयाजीराव गायकवाड या आदिनेत्याची ओळख जागविण्यासाठी त्यांचे साहित्य प्रकाशित करण्यात येत आहे. त्यानुसार पुढील १२ खंड तयार करण्यात आले आहेत. :-

| अ.क्र. | ग्रंथाचे नाव | अ.क्र. | ग्रंथाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | भाषणसंग्रह खंड -१ | ७ | Speeches & Addresses (Vol.२) |
| २ | भाषणसंग्रह खंड -२ | ८ | Selected Letters (Vol.१) |
| ३ | पत्रसंग्रह खंड - १ | ९ | Selected Letters (Vol.२) |
| ४ | पत्रसंग्रह खंड -२ | १० | Selected Letters (Vol.३) |
| ५ | पत्रसंग्रह खंड - ३ | ११ | Selected Letters (Vol.४) |
| ६ | Speeches & Addresses (Vol.१) | १२ | गौरवगाथा युगपुरुषाची |

२. या थोर राष्ट्रीय पुरुषांचे साहित्य राज्यातील सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी राज्य शासनाने सवलतीच्या दरात साहित्य उपलब्ध करुन दिले आहे व सदर ग्रंथ साठयातील सर्व शासकीय मुद्रणालयामध्ये विक्रीकरीता ठेवण्यात आले आहेत. साहित्य राज्यातील सर्व विद्यार्थी व जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी राज्यातील सर्व विद्यापीठे / महाविद्यालये व शासकीय ग्रंथालये यांच्या ग्रंथालयामध्ये वाचकांना उपलब्ध करुन देण्यात यावे. त्याकरीता सर्व प्रकाशित झालेले व भविष्यात प्रकाशित होणारे

खंड सर्व विद्यापीठ / महाविद्यालये / शासकीय ग्रंथालये यामधील ग्रंथालयामध्ये ठेवणे अनिवार्य करण्यात येत आहे.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असून त्याचा संकेताक २०१७११२२१६१२४६४००८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( सिद्धार्थ खरात )
शासनाचे सह सचिव

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.मंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, शालेय शिक्षण, सांस्कृतिक कार्य विभाग ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.राज्यमंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. अ. मु.स., उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
६. सचिव, मराठी भाषा विभाग, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
७. सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
९. कुलगुरु, सर्व अकृषि विद्यापीठे / अभिमत विद्यापीठे /स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे.
१०. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे/ अभिमत विद्यापीठे /स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे
११. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१३. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१४. संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१५. सर्व सह संचालक, उच्च शिक्षण / तंत्र शिक्षण.
१६. सर्व सह सचिव /उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. निवडनस्ती ( समन्वय ).